# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता महाविद्यालयीन स्तरावरील प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून सदर प्रवेश प्रक्रियेदरम्यान महाविद्यालये विहीत शुल्कापेक्षा अधिकचे नियमबाह्य शुल्क विद्यार्थ्यांकडून वसूल करीत असल्याबाबत विद्यापीठाकडे तक्रारी प्राप्त होत आहेत. प्रवेश निर्धारणावेळी विहीत शुल्कापेक्षा अधिकचे शुल्क बेकायदेशीररित्या वसूल करणे ही बाब अत्यंत गंभीर आहे, याची संबंधित संस्था व महाविद्यालये यांनी दखल घ्यावी.

सबब, विद्यापीठ संलग्नित कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील महाविद्यालयांना आदेशान्वये कळविण्यात येते की, शिक्षण शुल्क समिती, महाराष्ट्र शासन व विद्यापीठाने वेळोवेळी विहीत केलेल्या शुल्काव्यतिरिक्त कोणतेही नियमबाह्य शुल्क महाविद्यालयाकडून विद्यार्थी प्रवेशावेळी वसूल करू नये.

तसेच प्रवेश प्रक्रियेदरम्यान कोणत्याही प्रकारचे बेकायदेशीर शुल्क वसुल केल्याचे विद्यापीठाच्या अगर शासनाच्या निदर्शनास आल्यास अथवा विद्यार्थी/पालक यांच्याकडून याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास होणाऱ्या कारवाईस संबंधित संस्था/महाविद्यालयांचे अध्यक्ष/सचिव/प्राचार्य जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.

संचालक,
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ

संलग्नता/टी-२/बीएके/ 56
दिनांक : 15 JUL 2016

D:\Babasaheb 08.08.14\Draft.docx